# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०२/१२/१७
## दि.०२/१२/१७ रोजी दु.१२/०० वा.ते २२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतु:श्रृंगी पो स्टे ५७२/१७,भादविक ३९४,३४ |
| **फिर्यादी** | उमेश कदम,वय ३० वर्षे, रा.भुजबळ चौक, वाकड, पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील तीन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०२/१२/२०१७ रोजी सकाळी ११/३० वा.चे सुमारास, आयकॉन टॉवर बिल्डींग मधील एस.बी.आय. बॅक शाखे समोर बाणेर पुणे ते अरिया टॉवर्सचे गल्लीत, रोडवर बाणेर, पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे त्यांची स्प्लेंडर मोटर सायकलवरुन सुर्या हॉस्पीटलची ३ लाख २३ हजार १०७/-रुपये कॅश व एक चेक बॅगेत घेवुन भरण्यासाठी एस.बी.आय. व एच.डी.एफ.सी. बॅंक बाणेर रोड, पुणे येथे जात असताना ते सकाळी ११/३० वा.आयकॉन टॉवर बिल्डींग मधील एस.बी.आय. बॅक शाखे समोर बाणेर पुणे येथे येवुन, पाय-यावरुन चढुन जात असताना तीन अनोळखी इसमांनी फिर्यादीचे पाठीमागुन येवुन त्यापैकी एकाने फिर्यादीची गचांडी पकडुन व दुस-याने बॅग पकडुन त्यास अरिया टॉवर्सचे गल्लीत नेवुन लाथाबुक्यांनी मारहाण करून दुस-याने तेथे पडलेल्या दगड हातात घेवून फिर्यादीचे डोक्यात व हातावर मारून जखमी करून त्यांचेकडील एकुण ३ लाख २३ हजार १०७/-रुपये रक्कम असलेली बॅग जबरदस्तीने चोरून ते पल्सर मोटर सायकल वरील तिस-या इसमा सोबत बसुन पळून गेले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. संदेश केंजळे ९०१११३९१० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतु:श्रृंगी पो स्टे ५७१/१७,भादविक ३८१ |
| **फिर्यादी** | एक महिला, वय ६१ वर्षे, रा. डीपी रोड औंध, पुणे |
| **आरोपी** | एक महिला, रा. कस्तुरबा वसाहत, औंध, पुणे |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २८/११/२०१७ चे सकाळी ०८/३० वा.ते दि.३०/११/२०१७ रोजी ०७/०० वा.चे दरम्यान ९०३, अे बिल्डिंग,ट्वीन टॉवर, डीपी रोड औंध, पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी घरातील कपाटात व सुटकेस मध्ये ठेवलेले रोख रक्कम ५३ हजार व सोन्याच्या ,चांदीचे दागिने असा एकुण ३ लाख २३ हजार रु. किंमतीचा ऐवज त्यांचे मुलीचे येथे लग्नास पुणे कॅम्प येथे गेल्या असता दिनांक २८/११/१७ चे सकाळी ०८/३० वाजता ते दि.३०/११/२०१७ रोजीचे ०७/०० वाजणेचे दरम्यान फिर्यादी यांचे घरातील मोलकरीण हीने चोरल्याचा संशय आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. फड ९८२३०५७१४१ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतु:श्रृंगी पो स्टे ५७०/१७,भादविक ४५४, ३८० |
| **फिर्यादी** | भुपेंद्रसिंह कुशवाह,वय-२९ वर्षे,रा.डि.पी.रोड औंध पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक.०१/१२/२०१७ रोजी १०/०० वा.ते १८/०० वा.चे दरम्यान रा.फ्लॅट नं.२४, अमेय अर्पाटमेंट,मेडीपॉईन्ट हॉस्पीटल शेजारी डि.पी.रोड औंध,पुणे |
| **तपशिल** | वर नमुद ता.वेळी व ठिकाणी फिर्यादी त्यांचे राहते घरास लॉक करुन कामावर गेले असताना कोणीतरी अज्ञात चोरटयाने फ्लॅटचे सेफ्टीडोअरचे लॉक तोडुन त्यावाटे घरात प्रवेश करुन घरातील लोखंडी कपाटाचे बंद लॉकर उचकटुन त्यामधील रोख रक्कम व सोन्या-चांदिचे दागिने असा एकुण २ लाख ३१ हजार रु.किमतीचा ऐवज चोरी करुन चोरुन नेला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. डी एस शिंदे ७२७६१००१०० |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**